महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे 1 यांचे कार्यालय
१७डॉ. आंबेडकर मार्ग,लालदेवळासमोर, पुणे ४११ ००१

Phone : (020) 26125696
Fax : (020) 26122217
w'site : www.dydepune.co.in
e-mail : dydpune@gmail.com

## शालेय शिक्षण विभाग

जा.क्र.शिउसं/पुवि/आस्था-१०१/अ.सु.ध./म.लो.आ/क लि/नि.आ./२०२५/ ६२६५
दिनांक :- 17 SEP 2025

## : नियुक्ती आदेश :

विषय : महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट-क मुख्य परीक्षा-२०२३
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे लिपिक- टंकलेखक गट-क पदावर नियुक्ती करणेबाबत

संदर्भ : १. महाराष्ट्र लोकसेवा आयोग जाहिरात क्र.एनओटी-३६१७/सीआर-१३०/२०२२/जाहिरात क्र. १११/२०२३
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र . १४४२/गट-क संयुक्त लि टं./२०२३/चोवीस, दि.२२.७.२०२५
३. शासन पत्र क्र. संकीर्ण-११२५/ई-१२४२७६०/प्रशा-५, दिनांक ३०.७.२०२५
४. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. शिउसं/आस्था-१०१/असुध/मलोआ/कलि का.पडताळणी/पुवि/२०२५८५६३१,दिनांक ७.८.२०२५

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता संदर्भ क्र. १ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यांत आली होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे संदर्भ पत्र क्र. २ नुसार लिपिक-टंकलेखक या पदासाठी गुणानुक्रमानुसार निवड झालेल्या उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने लिपिक- टंकलेखक या पदासाठी गुणानुक्रमानुसार निवड झालेल्या उमेदवारास ते ज्या दिनांकास रुजू होतील त्या दिनांकापासून खालील रकाना क्रमाक ४ मध्ये दिलेल्या प्रवर्गात व रकाना क्रमांक ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या कार्यालयात लिपिक-टंकलेखक गट –क पदावर शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पुणे विभागस्तरीय आस्थापनेवर तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. सदरील नियुक्त्या हया समुपदेशनाने देण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | पदस्थापना दिलेल्या कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अमित वासुदेव भोसले | ईडब्लुएस | खुला | शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे |
| २ | श्री. छत्रगुण ज्ञानोबा कदम | ईडब्ल्यूएस | ईडब्ल्यूएस | शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे |
| ३ | श्री. अमर सुरेश खारतोडे | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (क) | वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथ) सोलापूर |
| ४ | श्री. जैनक सुरेंद्र आण्णा | इतर मागास वर्ग | इतर मागास वर्ग | वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्य) पुणे |
| ५ | श्री. संकपाळ सुहास हिरामन | इतर मागास वर्ग | इतर मागास वर्ग | शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद, पुणे |
| ६ | श्री. काळेल परमेश्वर गलबु | इतर मागास वर्ग | इतर मागास वर्ग | शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | कु. रेश्मा रामचंद्र पाटील | ईडब्ल्यूएस | खुला (स्त्री) | शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे |
| ८ | श्रीम. रेणुका भरत देशमुख | इतर मागास वर्ग | इतर मागास वर्ग (स्त्री) | शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे |
| ९. | श्री. अनिकेत राजेंद्र गोफणे | विमुक्ती जाती-अ | विमुक्ती जाती-अ | वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्य) अहिल्यानगर |
| १०. | श्री. सुशिलकुमार पुंडलीकराव खरात | अनुसुचित जाती | अनुसुचित जाती | पिठासिन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, पुणे |
| ११. | श्री. मिलिंद गणपत दळवी | इतर मागास वर्ग | इतर मागास वर्ग /माजी सैनिक | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे |

वरीलप्रमाणे तात्पुरती नियुक्ती ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१. लिपिक- टंकलेखक (गट- क) या पदावर वेतनस्तर एस-६ रु. १९९००-६३२०० मध्ये अनुज्ञेय मूळ वेतन व त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेले व शासनाच्या वेळोवेळी निर्गमित निर्देशानुसार इतर भत्ते पूरक भत्ते अनुज्ञेय राहतील.

२. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या अथवा या कार्यालयाचे अधिनस्त पुणे विभागातील दुय्यम कार्यालयात बदलीने कोणत्याही ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. ती पदस्थापना उमेदवाराला बंधनकारक राहील.

३. सदर पदावरील नियुक्ती स्विकारण्यापुर्वी एखादा उमेदवार अन्य कोणत्याही शासकीय/निमशासकीय/इतर कार्यालयात नोकरीत असेल तर त्यांना त्या नोकरीचा राजीनामा किंवा कार्यमुक्ती आदेश नियुक्ती स्विकारते वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

४. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या-१२, दिनांक २८.०५.२०१८, महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेच्या विनियमन) नियमावली, १९८२ मधील नियम ४(२) (अ) आणि सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २१.६.२०२१ मधील तरतुदीनुसार वरील उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू व्हावे. तसेच प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तसेच नियुक्ती स्विकारली नाही तर त्यांचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता, निवडसूचीतून कमी करण्यात येईल.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, मंत्रालय,मुंबई दिनांक १९.३.२००३ मधील तरतुदीनुसार आपणास महाराष्ट्र राज्य उच्च व तांत्रिक शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत **MSCIT** ही संगणकाची परीक्षा शासकीय नियमाप्रमाणे नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचे आत उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील. सदर परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास कोणतेही कारण न दाखवता आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

६. उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती ही शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.चापअ-१००८ /प्र.क्र.२१४ /०८ /१६-अ, दिनांक ०९.०१.२००९ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. चरित्र-२११७ /प्र.क्र.४८३ /२०१७-१६-अ, दिनांक २८.८.२०१७ नुसार चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणीच्या अधीन निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून त्यांच्या चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा उमेदवारानी सादर केलेली माहिती असत्य असल्याचे आढळून आल्यास सदर नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल. तसेच भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई आणि शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही-२०२३/प्र.क्र.१/कार्यासन-१२, दिनांक १२.१.२०२३ नुसार इंग्रजी टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणा-या उमेदवारांची लिपिक- टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर उमेदवाराने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे. तसेच, केवळ मराठी टंकलेखन धारण करणा-या उमेदवारांची लिपिक-टंकलेखक संवर्गामध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्यांने नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित उमेदवाराची वेतनवाढ रोखण्यात येईल.

८. खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता शिफारस झालेल्या खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ०४.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील (इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या दिनांक ३१.०१.२०२० च्या शासन निर्णयानुसार)

९. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गातील उमेदवराना उन्नत व प्रगत गटात (क्रिमिलेयर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच संबंधित उमेदवारांना शासन निर्णय इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग क्र.सीबीसी-२०२०/प्र.क्र. १८/मावक दिनांक ३१.०१.२०२० मधील तरतुदीनुसार आणि शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र. सीबीसी २०१२/प्र.क्र. १८२/विजाभज-१, दिनांक २५.०३.२०१३, शासन शुध्दीपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र. संकीर्ण-२०२३ /प्र.क्र.७६ /मावक, दिनांक १७.२.२०२३ व दिनांक ०९.०३.२०२३ मधील तरतुदीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात आली आहे. सदर प्रमाणपत्र अवैध ठरल्यास तात्काळ नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१०. आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) उमेदवारांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. राआधो-४०१९/प्र.क्र. ३१/१६-अ, दिनांक १२.२.२०१९ व दिनांक ३१.५.२०२१ अन्वये विहित तरतुदींच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात आली आहे. सदर प्रमाणपत्र अवैध ठरल्यास तात्काळ नियुक्ती रद्द करण्यात येईल.

११. आपली नेमणूक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून भविष्यात पदे कमी झाल्यास अथवा इतर कारणास्तव आपली सेवा समाप्त केल्यास, आपला या पदावरील नेमणुकीसंबंधी कोणताही हक्क अबाधित राहणार नाही.

१२. ज्या उमेदवारांची नियुक्ती ही आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक या आरक्षणामधून झालेली आहे. त्या उमेदवारांनी याबाबत सादर केलेली प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून उमेदवारास सदरची पदस्थापना देण्यात येत आहे. भविष्यात आपण सादर केलेल्या आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र अवैध आढळल्यास आपले नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील.

१३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. आरटीह १०८२-३५०२-सीआर-१००-१६-अ, दिनांक ०२.०९.१९८३ नुसार माजी सैनिक वर्गवारीचा दावा केलेल्या उमेदवारांची नियुक्ती त्यांच्या माजी सैनिक वर्गवारीच्या दाव्याच्या तपासणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१४. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र. १८०/२८, दिनांक १३.०६.२०१९ व संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का-२८, दिनांक ३०.५.२०२३ नुसार शासकीय



Scanned with OKEN Scanner

वाणिज्य संस्थेचे विहित वेगाच्या टंकलखनाचे प्रमाणपत्र शासन सेवेतील नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील.

१५. उपरोक्त उमेदवार त्यांच्या सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असेल तर त्यांनी शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक ०२.१२.१९९७ मधील तरतुदीनुसार शासनास किमान एक महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. मात्र आपल्या सेवेचे त्यागपत्र सक्षम अधिका-यांनी स्विकारुन आपणास कार्यमुक्त व्हावयाचे असेल तर शासन नियमाप्रमाणे एक महिन्याचे मूळ वेतन व भत्ते याप्रमाणे येणारी रक्कम शासनाकडे रोख भरावी लागेल. सेवेचे त्यागपत्र स्विकारण्याचे अथवा न स्विकारण्याचे अधिकार सक्षम प्राधिका-यांनी राखून ठेवले आहेत. सेवेच्या त्यागपत्राच्या पूर्वसूचनेच्या कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा व इतर सवलती आपणास मिळणार नाहीत. मात्र गैरशिस्त, सेवानियमाचा भंग इ.कारणासाठी सेवासमाप्त करताना आपणास नोटीस देण्याचे नियुक्ती प्राधिका-यास बंधन राहणार नाही.

१६. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १.७.२००५ नुसार दिनांक २८.३.२००६ व तदनंतर दोन पेक्षा अधिक मुले झाल्यास शासकीय नोकरीस उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१७. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय वशिअ १२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२.०६.२०१४ नुसार नेमणुकीच्या दिवशी महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार आपण धारण करीत असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता इत्यादींची माहिती विहित नमुन्यात भरून आपल्या नेमणूकीच्या कार्यालयात देणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१८. उमेदवारांना नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणेसाठी प्रवासभत्ता/भाडे देय नाही.

१९. भविष्यात शासनाकडून वेळोवेळी पारित करण्यात येणारे कायदे, नियम आपणास बंधनकारक राहतील.

२०. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग दिनांक ६.६.२०१७ मध्ये करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा हे विषय घेऊन आपण उत्तीर्ण नसल्यास एतदर्थ मंडळाची हिंदी / मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल.

२१. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग दिनांक ६.६.२०१७ नुसार विभागीय परीक्षा नियमानुसार ज्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे त्या विभागीय परीक्षा विहित कालावधीमध्ये उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांचे स्थायीकरण/ पदोन्नती रोखण्यात येईल.

२२. शासन वित्त विभाग क्रमांक अनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये दिनांक १.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर आपली शासकीय सेवेत नियुक्ती होत असल्यामुळे आपणांस नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. तसेच या संदर्भात वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र. ३४/सेवा-४, दिनांक ३१.३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या तरतुदी लागू राहतील. तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील.

२३. वरीलप्रमाणे नियुक्ती देण्यांत आलेल्या उमेदवारांस शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग दिनांक ६.६.२०१७ नुसार सदर पदाचे सेवा प्रवेश नियमातील सर्व अटी व सेवाशर्ती लागू राहतील.

२४. सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र कमांक पअंक-१०१०/७१७१/प्र.क्र.३२२/१०/१६-अ, दिनांक २६.८.२०१० अन्वये एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त/माजी सैनिक या प्रवर्गातून या नियुक्तीपूर्वी समांतर आरक्षणांतर्गत शिफारस/ नियुक्ती झालेली असल्याचे आढळून आल्यास सदर तात्पुरती नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.



Scanned with OKEN Scanner

२५.ज्या उमेदवारांची नियुक्ती राखीव प्रवर्गातून झाली आहे अशा उमेदवारांना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब, दिनांक १२.१२.२०११ नुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी सबंधित उमेदवारांची राहील. अन्यथा सदर उमेदवारांची नियुक्ती कोणतेही कारण न देता समाप्त करण्यात येईल.

२६.ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आली असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दिनांक १६.५.२००७ मधील सूचनेनुसार कार्यवाही करण्यांत येईल.

२७.पदस्थापना देण्यात येणा-या उमेदवाराची सर्व कागदपत्रे संपूर्णपणे समाधानकारक असल्याची खातरजमा झाल्यानंतरच उमेदवारास हजर करुन घेणे, वैदयकीय तपासणीच्या अहवालाची पूर्तता करुन घेणे, पूर्व चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेणे तसेच जात वैधता प्रमाणपत्र विहित कालावधीत प्राप्त करुन घेणे, ही सर्व जबाबदारी संबंधित कार्यालयप्रमुख व संबंधित उमेदवार यांची राहील.

२८.आदेशातील नमूद उमेदवारांनी नेमणूक देताना किंवा त्यानंतर विशिष्ट ठिकाणी नियुक्ती देण्याकरीता राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास सदर उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास पात्र ठरेल.

२९. उपरोक्त अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहून आपली लिपिक-टंकलेखक (गट-क) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येत असून, आपण नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयात कार्यालयीन वेळेत रुजू व्हावे. वरील कालावधीत कार्यालयात रुजू न झाल्यास आपली नेमणूक रद्द समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

17/09. 2025

(डॉ.गणपत मोरे)
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे ०१

प्रति,

उपरोक्त यादीतील सर्व संबंधित उमेदवारास (डाक पोच नोंद देय/ ईमेलव्दारे)

प्रत- माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:

१. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भवानी पेठ, पुणे
१. मा. पिठासिन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, पुणे
२. शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद, पुणे / अहिल्यानगर
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे / अहिल्यानगर / सोलापूर
४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे / अहिल्यानगर / सोलापूर
५. आस्थापना / लेखा शाखा, प्रस्तुत कार्यालय

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
३. मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१



Scanned with OKEN Scanner